जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ३६८ दिनांक - १७/०५/२०२३

### सिंहगड रोड पो स्टे पुणे शहर

### भुमकर चौक न-हे पुणे येथील व्ही.के.डी.पेट्रोल पंपावरील कर्मचा-यांना कु-हाडीच्या सहाय्याने गंभीर जखमी करुन जबरी चोरी करणा-या आरोपींच्या आवळल्या मुसक्या

दिनांक २३/०८/२०२२ रोजी दोन अनोळखी इसमांनी व्ही.के.डी. पेट्रोल पंप भुमकर चौक,न-हे,पुणे येथे पेट्रोल पंपावर रा़त्रीच्या वेळी झोपलेले कामगार यांना कु-हाडीने मारुन गंभीर जखमी करुन त्याचेकडील एकुण २०,४००/- रुपये रोख रक्कम जबरदस्तीने चोरी करुन नेली होती. सदरबाबम दोन अनोळखी इसमांविरुध्द सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली होती.

त्यानतंर दाखल गुन्हयातील दोन अनोळखी इसमांचा सिंहगड रोड पोलीस स्टेशऩचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांकडे सखोल तपास करीत असताना,**सहा.पो.उप-निरीक्षक,आबा उत्तेकर**, **पोलीस अंममलदार, क्षीरसागर व ओलेकर** यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,सुमारे दहा महिन्यापुर्वी सिंहगड रोड पोलीस स्टेशन हद्दीतील भुमकर चौकाजवळ असलेल्या व्ही.के.डी. पेट्रोल पंपावर रात्रीच्या वेळी जबरदस्तीने घुसुन मारहाण करुन रोख रक्कम चोरी करुन घेवुन जाणारे दोन इसमापैकी एक इसम हा हिंगणे चौक,सिंहगडरोड पुणे येथे थांबलेला आहे अशी बातमी मिळाल्याने ती बातमी मा.वरिष्ठांना कळविली असता,त्यांनी सदर बातमीची खात्री करुन योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिल्याने,वरील स्टाफसह हिंगणे चौक,सिंहगड रोड,पुणे येथे जावुन बातमीप्रमाणे **ऋषिकेश रमेश कदम,वय-२३ वर्षे,रा.माऊली कृपा बिल्डींग,चरवडवस्ती,वडगाव,पुणे** यास अटक करुन त्याचेकडे अटक मुदतीत तपास करता,त्याने त्याचा साथीदार **मानस सिताराम पिसे,वय २३ वर्षे ,रा.पाण्याचे टाकी जवळ वडगाव,पठार वस्ती,वडगाव,पुणे** याचेसह सदरचा गुन्हा केल्याचे सांगितल्याने व तो सध्या ता.भुम जि.उस्मानाबाद येथे असलेबाबत सांगितल्याने,सदर ठिकाणी तपास पथकातील सपोनि.सचिन निकम व पोलीस स्टाफ असे रवाना होवुन आरोपी मानस पिसे याचा शोध घेवुन,त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे अधिक तपास करता त्यांनी व्ही.के.डी.पेट्रोल पंपावर जबरदस्तीने चोरी केल्याचे सांगितले असुन,त्यांना नमुद गुन्हयात अटक करुन मा.न्यायालयात हजर केले असता,मा.न्यायालयाने दि.१९/०५/२०२३ रोजी पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आली आहे. दाखल गुन्हयाचा पुढील अधिक तपास सपोनि.सचिन निकम सिंहगडरोड पोलीस स्टेशन पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर, श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परीमंडळ-३,श्री.सुहेल शर्मा, मा.सहा.पोलीस आयुक्त,सिंहगड रोड विभाग,पुणे,श्री.राजेंद्र गलांडे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक,अभय महाजन, पोलीस निरीक्षक(गुन्हे),जयंत राजुरकर यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक,सचिन निकम, पोलीस अंमलदार, आबा उत्तेकर, संजय शिंदे, शिवाजी क्षिरसागर, राहुल ओलेकर, अमित बोडरे, राजाभाऊ वेगरे, विकास बांदल, विकास पांडुळे, अमोल पाटील, सागर शेडगे, देवा चव्हाण, स्वप्नील मगर, अविनाश कोंडे, दक्ष पाटील यांचे पथकाने केली.


सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे शहर.
॥ हेल्पलाईन ॥
सिंहगड रोड पोलीस स्टेशन पुणे शहर
सिंहगड रोड पोलीस स्टेशन
पुणे शहर
सिंहगडरोड पोलीस स्टेशन
पुणे